MHPU240004372006

**<u>रे.मु.नं. ११०/२००६ मधील नि. १७० वरील आदेश</u>**

१. प्रस्तुत अर्ज वादीने प्रतिवादी क्र. १८, ५३ड व ४७अ हे मयत झाल्याने त्यांचे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रदद् होवून त्यांच्या कायदेशीर वारसांना दावे अर्जात सामील करण्यास जो विलंब झाला तो माफ होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादीच्या अर्जातील कथनानुसार, प्रतिवादी क्र. १८, ५३ड व ४७अ हे अनुक्रमे दि. २९.०९.२०१९, २३.०२.२०२० व दि. ०२.१२.२०२० रोजी मयत झालेले आहेत. परंतु कोविड—१९ च्या संसर्गामुळे लॉकडाउन असल्यामुळे प्रतिवादी क्र. १८, ५३ड व ४७अ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दीड वर्षाचा उशीर झालेला आहे. त्यामुळे मयत प्रतिवादींचे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रदद् होवून त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होवुन अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादींच्या वारसांचे म्हणणे मागविले असता, त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन वादीचो अर्ज मंजुर करण्यास हरकत नसल्याबाबत म्हणणे दाखल केले.

४. युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले असता, वादीने प्रस्तुत दावा हा सरसनिरस मानाने वाटप होवून ताबा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. परंतु दाव्याचे कामकाज प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र. १८, ५३ड व ४७अ अनुक्रमे दि. २९.०९.२०१९, २३.०२.२०२० व दि. ०२.१२.२०२० रोजी मयत झाल्याचे दिसून येते. परंतु वादीने प्रस्तुत अर्ज हा दि. ०५/१०/२०२१ रोजी दाखल केलेला दिसतो. अशा परिस्थितीत, वादींनी प्रस्तुतचा दिलेला अर्ज व त्याबाबत कायदेशीर बाब पाहता, दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश २२ नियम ०४ प्रमाणे मयत प्रतिवादीचे वारस सदर व्यक्ती मयत झाल्यापासून ९० दिवसांचे आत अर्ज सादर करुन

अभिलेखावर घेणे आवश्यक असते. वादीने सदरचा अर्ज दि. ०५/१०/२०२१ रोजी दाखल केलेला दिसतो. परंतु असे जरी असले तरी, मयत प्रतिवादी हे कोरोनासारख्या जागतिक महामारीमुळे झालेल्या लॉकडाउन मध्ये मयत झाल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांचे वारस मुदतीत अभिलेखावर घेता आले नसल्याचे दिसून येते. वादी यांनी त्यांचे अर्जातील कथनाचे सत्यतेकरीता वादी लक्ष्मण बाळाजी गायकवाड यांचे प्रतिज्ञापत्र निशाणी १७१ वर व प्रतिवादी क्र. १८ व ४७अ यांचे मृत्यूदाखल्याची प्रत निशाणी क्र. १६७ वर दाखल केलेली आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत, सदर अर्जात नमुद केलेली परिस्थिती व कायदेशीर बाब या सर्व बाबी सारासार न्यायबुध्दीने विचारात घेता सदर अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींच्या न्याय हक्कावर कोणत्याही प्रकारे गदा येणार नाही. उलटपक्षी, उभय पक्षकारांमधील खरा वाद अंतिमतः न्यायनिर्णीत करणे सोईचे होईल. तसेच सदरचा दावा हा सन २००६ पासून प्रलंबित असल्याचे दिसते. त्यामुळे वादींना सदर मयत प्रतिवादींचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेल्या विलंबाबाबत खर्च लादणे आवश्यक आहे. सबब, नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन, वादींचा प्रस्तुत अर्ज मंजुर करणे आवश्यक असलेच्या निष्कर्षाप्रत येवुन, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. वादींचा प्रस्तुत अर्ज निशाणी १७० हा रक्कम रुपये ३००/— (अक्षरी रुपये तीनशे मात्र) सरकारच्या खात्यात भरण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १८, ५३ड व ४७अ हे मयत झाल्याने झालेला अबेटमेंटचा आदेश रदद् होवून त्यांच्या कायदेशीर वारसांना दावे अर्जात सामील करण्यास जो विलंब झाला तो माफ करण्यात येतो.

घोडेगाव
दि.११.०७.२०२३

(एम. एस. माळी)
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
घोडेगाव

MHPU240004372006

## <u>रे.मु.नं. ११०/२००६ मधील नि. १६८ वरील आदेश</u>

१. प्रस्तुत अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २२ नियम ४ सह आदेश ६ नियम १७ प्रमाणे प्रतिवादी क्र. १८, ५३ड व ४७अ हे मयत झाल्याने त्यांचे नाव दावे अर्जातून कमी करुन त्यांच्या कायदेशीर वारसांना दावे अर्जात सामील करण्यासाठी तसेच त्याप्रमाणे दावा मिळकतीत झालेल्या बदलाच्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादींच्या अर्जातील कथानानुसार, प्रतिवादी क्र. १८, ५३ड व ४७अ हे अनुक्रमे दि. २९.०९.२०१९, २३.०२.२०२० व दि. ०२.१२.२०२० रोजी मयत झालेले आहेत. त्यामुळे अर्जात नमुद केल्याप्रमाणे त्यांचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे व आवश्यक आहे. तसेच दरम्यानचे काळात प्रतिवादी निधन पावल्याने वारस रेकॉर्डवर घेतांना महसुल खात्याकडे एकाच सर्वे नंबरचे दोन सात बारा उतारे तयार झाले आहे. तसेच दावा प्रलंबित असतांना प्रतिवादींनी त्यांचे हिश्यापेक्षा जास्त क्षेत्र ति—हाईत इसमांना खरेदी दिले असल्याने दाव्यात त्याप्रमाणे दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदर दुरुस्ती अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींच्या हक्क, अधिकारांचे काणेतेही नुकसान होणार नाही. सबब, दुरुस्ती अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली आहे.

३. युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजाचे अवलोकन केले असता, वादीने प्रस्तुत दावा हा सरसनिरस मानाने वाटप व ताबा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. परंतु दाव्याचे कामकाज प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र. १८, ५३ड व ४७अ हे अनुक्रमे दि. २९.०९.२०१९, २३.०२.२०२० व दि. ०२.१२.२०२० रोजी मयत झाल्याचे दिसून येते. सबब, अशा परिस्थितीत त्यांच्या कायदेशीर वारसांना दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २२ नियम ४ प्रमाणे दावा चालविण्याचा अधिकार टिकून रहात असल्याने मयत प्रतिवादींचे नाव दावे अर्जातून कमी करुन त्यांच्या कायदेशीर वारसांना दाव्यात सामील करुन त्याप्रमाणे दुरुस्ती दावे अर्जात करणे गरजेचे आहे. शिवाय

प्रतिवादी क्र. १८, ५३ड व ४७अ हे मयत झाल्याने अर्जात नमुद केल्याप्रमाणे त्यांचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे व आवश्यक आहे. तसेच वादीच्या कथनाप्रमाणे महसुल विभागाकडे दावा मिळकतीचे दोन सातबारा उतारे तयार झाले आहे. तसेच दावा हा सरसनिरस मानाने वाटपाचा असल्याने त्यात दावा मिळकतीचे वर्णन योग्य प्रकारे असणे आवश्यक आहे. तसेच सदर अर्जावर प्रतिवादींना संधी असतांना देखील त्यांनी त्यांचे म्हणणे दिलेले नाही. शिवाय प्रतिवादी क्र. १८अ, ४८अ १ ते ४ यांनी वादीच्या प्रस्तुत अर्जास हरकत नसल्याबाबत म्हणणे दिले. अशा परिस्थितीत, अर्जात मागणी केल्याप्रमाणे दुरुस्ती अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींच्या न्यायहक्कावर कोणत्याही प्रकारे गदा येणार नाही अथवा दाव्याचे मुळ स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. उलटपक्षी, प्रस्तुत अर्ज मंजुर केल्यास उभय पक्षकारांमधील खरा वाद अंतिमत: न्यायनिर्णीत करणे सोईचे होईल. त्यामुळे निशाणी क्र. १७० वर झालेला आदेश विचारात घेता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **<u>आ दे श</u>**

१. वादींचा प्रस्तुतचा अर्ज निशाणी १६८ मंजूर करण्यात येत आहे.

२. वादींना असा आदेश देण्यात येतो की, त्यांनी १४ दिवसांचे आत अथवा पुढील तारखेपर्यंत निशाणी क्र. १७० वरील आदेशाप्रमाणे दंडाची रक्कम भरुन प्रस्तुत अर्जाप्रमाणे दावे अर्जात/सरनाम्यात दुरूस्ती करावी.

घोडेगाव
दि.११.०७.२०२३

(एम. एस. माळी)
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
घोडेगाव